# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार
### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१
Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्र. ४८-२२ दिनांक १२/०२/२०२२

## “ रिक्षा चोरी करणा-या टोळीस अटक करुन ०६ रिक्षा हस्तगत मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई ”

मिरा-भाईन्दर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील विशेषतः काशिमिरा, नयानगर, मिरारोड, वालीव परिसरात रिक्षा चोरीच्या गुन्हयात वाढ होत असल्याने, मा.वरिष्ठांनी सदर गुन्हयावर आळा घालण्या करीता मार्गदर्शनात्मक सुचना दिलेल्या होत्या. त्याअनुषंगाने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेतील अधिकारी व कर्मचारी यांनी तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तसेच गुप्तबातमीदारा मार्फत अशाप्रकारच्या चोरी करणा-या गुन्हेगारांची तात्काळ माहीती प्राप्त केली.

दिनांक ०३/०२/२०२२ रोजी विरार, नालासोपारा परिसरात गुन्हेगारावर वॉच पेट्रोलिंग करुन गस्त करीत असतांना चंदनसार विरार पुर्व येथील आर.के. हॉटेलच्या समोरील रस्त्याच्या बाजुस संशयास्पदरित्या एक रिक्षा उभी असलेली दिसल्याने सदर रिक्षा चालकाचे ताब्यातील रिक्षा क्र. एमएच-४८-बीएफ-२५८९ चा नंबर हा खोटा असल्याचे संशय आल्याने, त्या रिक्षाचा इंजिन नंबर AZZWGE97235 व चेसीस नंबर MD2A27AZ1GWE56212 वरुन खात्री केली असता, सदर रिक्षाचा नंबर हा एमएच-०४-एचजे-४००८ असल्याने निष्पन्न झाले. सदर रिक्षाचे नंबर वरुन मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील पोलीस ठाणेच्या अभिलेखावरील दाखल गुन्हयांची पडताळणी करता, सदर ऑटो रिक्षा ही मिरारोड पो.ठाणे गुन्हा रजि नं I २८/२०२२ भादविसक - ३७९ हया गुन्हयातील चोरीची असल्याचे निष्पन्न झाल्याने आरोपी १) प्रफुल्ल गायकवाड, वय ३० वर्षे, राठि. यादव चाळ, कुंभारपाडा, विरार पुर्व, ता.वसई, जि.पालघर, २) प्रकाश त्रिवेदी, वय-२६ वर्षे, कुभांरपाडा, कन्हेर फाटा, विरार पूर्व, ता.वसई जि.पालघर ३) किरण प्रसाद वय-२६ वर्षे, रा.जाधवनगर, दिलीप शेठची चाळ, विरार पुर्व ता.वसई जि.पालघर यांना ताब्यात घेवुन त्याचेकडे तपास करता, त्यांनी खाली प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहे.

१) मिरारोड पो.ठाणे गुन्हा रजि.नं I २८/२०२२, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे
२) वालीव पोलीस ठाणे गु.रजि.नं. I २६/२२, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे
३) नयानगर पोलीस ठाणे गु.रजि.नं.I २१/२०२२, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे
४) काशिमिरा पो.स्टे. गु.र.नं ८५०/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे
५) काशिमिरा पो.स्टे. गु.र.नं ५७०/२०२१, भा.द.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे

वरिल प्रमाणे गुन्हे केल्याचे निष्पन्न होवुन त्याचेकडुन ०६ रिक्षा हस्तगत करुन ०५ गुन्हे उघडकीस आणुन एकुण ३,२०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील,पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), व श्री. अमोल मांडवे,सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.नि. राहुल राख, सपोनि अमोल आंबवणे, सपोनि/दत्तात्रय सरक, सपोनि/नितीन बेंद्रे, पोउनि/कैलास सोनावणे, सफौ/चंद्रकांत पोशिरकर, पोहवा/ जनार्दन मते, सुरेश राणे, मनोहर तावरे, विकास यादव, पोना/ गोविंद केंद्रे, राजाराम काळे,शिवाजी पाटील, पोअं./प्रविणराज पवार, महेश वेल्हे,सतीष जगताप, सुशील पवार,संग्राम गायकवाड यांनी केलेली आहे.

------ oooo ------